महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४

Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२ ई, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

(कालमर्यादा : ३१.०७.२०२० )

जा.क्र. विकापु/ललो/गोप/वागोअ/२०२०-२१/ 1673

दिनांक :- 01 JUN 2020

**परिपत्रक**

विषय :- वार्षिक कार्यमूल्यमापन अहवाल २०१९ - २०२० बाबत ...

संदर्भ :- १. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. सीएफआर १२१०/प्र.क्रं.४७/२०१०/तेरा दिनांक ०१.११.२०११

२. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. सीएफआर १२११/प्र.क्रं.२१७/२०१०/तेरा दिनांक १७.१२.२०११

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएफआर १२११/प्र.क्र. २५७/तेरा दिनांक ०२.०२.२०१७

४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा दिनांक ०७.०२.२०१८

५. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. विकापु/ललो/गोप/वागोअ/२०१९-२०/४९ दिनांक २७.०२.२०२०

६. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.सीएफआर १२२०/प्र.क्र.३२/का.१३ दिनांक २३.०४.२०२०

या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व **अशासकीय अनुदानित संस्थाप्रमुखांना** सूचित करण्यात येते की, संदर्भ क्रमांक ५ अन्वये संस्थेतील सर्व शिक्षक व तृतीयश्रेणी कर्मचा-यांचे सन २०१९-२० (प्रतिवेदन कालावधी ०१.०४.२०१९ ते ३१.०३.२०२० ) कार्यमूल्यमापन अहवाल तसेच चतुर्थश्रेणी कर्मचा-यांची टिपणे लिहून दिनांक ३०.०४.२०२० पर्यंत या कार्यालयास सादर करण्यास सूचित करण्यात आले होते. तरी संदर्भ क्रमांक ६ च्या शासन निर्णयान्वये सन २०१९-२० चे कार्यमुल्यमापन अहवाल/टिपणे सुधारित वेळापत्रकान्वये दिनांक ३१.०७.२०२० पर्वी या कार्यालयास सादर करावयाची आहेत.

संस्थेतील सर्व शिक्षक व तृतीयश्रेणी कर्मचा-यांचे कार्यमूल्यमापन अहवाल तसेच चतुर्थश्रेणी कर्मचा-यांच्या कामाच्या मूल्यमापनार्थ टिपणे लिहून विहित कालमर्यादेत सादर करुन त्यांचे मूल्यमापन करुन घेण्याची जबाबदारी संस्थाप्रमुखांची आहे. त्यानुसार कार्यवाही न केल्याने भविष्यात काही प्रशासकीय अडचण निर्माण झाल्यास त्यास संबंधित संस्थाप्रमुख जबाबदार राहतील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

( डॉ. दिलीप नंदनवार )
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

१. सर्व अशासकीय अनुदानित संस्थाप्रमुख, पुणे विभाग
२. प्रोग्रॅमर, संगणक विभाग, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे यांना तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी